महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

जावक क्रमांक : तंशिविकापु/विवि/थेट द्वितीय वर्ष रिक्त जागा/२०२२/४८८४ दिनांक : १३.१०.२०२२

**महत्वाचे परिपत्रक** 13 OCT 2022

प्रति,
प्राचार्य,
शासकीय/अशासकीय अनुदानित/खाजगी विनाअनुदानित
अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था,
पुणे विभाग.

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये थेट द्वितीय वर्ष प्रवेशासाठी रिक्त जागांची नोंदणी करण्याबाबत..**

उपरोक्त विषयास अनुसरुन, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील पदवी अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या थेट द्वितीय वर्ष प्रवेश प्रक्रियेच्या अनुषंगाने, आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील द्वितीय वर्ष पदवी अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील संस्थांतर्गत शाखा बदल केलेल्या विद्यार्थ्यांचे माहिती व विद्यार्थ्यांचा निकाल राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्षाच्या थेट द्वितीय वर्ष अभ्यासक्रमाच्या संकेतस्थळावरील **Vacancy Calculation Module** मधून संस्थेच्या लॉगीनद्वारे ऑनलाईन पध्दतीने अपडेट केल्यानंतर, रिक्त राहिलेल्या जागांची पडताळणी करुन अंतिम मान्यते करिता या विभागीय कार्यालयाकडे ऑनलाईन पध्दतीने सबमिट करावी. तसेच ज्या अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांमधील शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांचा प्रवेश रद्द झाला असेल तर अशा विद्यार्थ्यांचे लिव्हींग सर्टीफीकेटची कार्यालयीन प्रत या विभागीय कार्यालयास ई-मेलद्वारे (info.ropune@gmail.com) सादर करावी. ई-मेल पाठविताना विषयामध्ये (Direct Second Year vacancy confirmation against cancellation of admission for Inst code 6XXX) असे नमूद करावे. तसेच संस्थेचे पत्र व लिव्हींग सर्टीफीकेट एकाच पीडीएफ फाईल मध्ये पाठवावे.

**संस्थेने थेट द्वितीय वर्ष प्रवेश प्रक्रिया २०२२-२३ करिता जागा पडताळणीची कार्यवाही दिनांक २०.१०.२०२२ रोजी (सायंकाळी ५ वाजेपर्यंत) पूर्ण करावी. विहित मुदतीत प्रवेशासाठीच्या जागा निश्चितीबाबतची माहिती अपडेट न केल्यास, संस्थेतील प्रथम वर्षातील रिक्त जागांचा तसेच रद्द झाल्यामुळे रिक्त झालेल्या जागांचा समावेश थेट द्वितीय वर्ष प्रवेश प्रक्रियेसाठी करता येणार नाही याची गांभीर्याने नोंद घ्यावी.**

(मा. रा. जाधव)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत :
१) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई (कार्यासन क्र. २अ) यांना माहितीस्तव.
२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेसाठी.